॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)

## जनसंपर्क विभाग

जळगाव (प्रतिनिधी) दि. २४ : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या परिसरातील विविध प्रशाळांच्या संयुक्त विद्यमाने क्रिकेट, बॅडमिंटन, बुद्धिबळ तसेच ४०० मीटर धावणे अशा विविध क्रीडा प्रकारांच्या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धांमध्ये एकूण ३४३ खेळाडूंनी सहभाग नोंदवला असून त्यामध्ये २०६ मुले आणि १३७ मुलींचा समावेश आहे.

या क्रीडा स्पर्धांचे उद्घाटन विद्यापीठाचे प्र- कुलगुरू प्रा. एस. टी. इंगळे यांच्या हस्ते पार पडले. यावेळी कुलसचिव डॉ. विनोद पाटील, क्रीडा विभागाचे संचालक डॉ. दिनेश पाटील, अधिसभा सदस्य डॉ. विशाल पराते, प्रा. दीपक दलाल, प्रा. किशोर पवार, प्रा. उज्वल पाटील, प्रा. आकाश धनगर, अमर हटकर आदी उपस्थित होते.

बुद्धिबळ स्पर्धेच्या निकालात मुलींच्या गटात प्रथम क्रमांक गणित प्रशाळा, द्वितीय क्रमांक जीवशास्त्र प्रशाळा, तर तृतीय क्रमांक रसायनशास्त्र प्रशाळेतील विद्यार्थिनींनी पटकावला. तर मुलांच्या गटात प्रथम क्रमांक रसायन तंत्रज्ञान संस्था, द्वितीय क्रमांक जैवशास्त्र प्रशाळा, तर तृतीय क्रमांक गणित प्रशाळेतील विद्यार्थ्यांनी मिळवला. ४०० मीटर धावण्याच्या स्पर्धेत मुलींच्या गटात प्रतीक्षा जगताप हिने प्रथम क्रमांक, सवित्रा पावरा हिने द्वितीय क्रमांक, तर उषा थोरात हिने तृतीय क्रमांक पटकावला.

या प्रसंगी प्र- कुलगुरू प्रा. एस. टी. इंगळे यांनी सर्व विजेत्या व सहभागी खेळाडूंचे अभिनंदन करत त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. तसेच बॅडमिंटन व क्रिकेट स्पर्धांचे अंतिम सामने दिनांक २५ रोजी आयोजित करण्यात येणार असल्याची माहिती क्रीडा संचालक डॉ. दिनेश पाटील यांनी दिली.

**बातमी नं. २**

जळगाव (प्रतिनिधी) दि. २४ :- कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या पर्यावरण व भूशास्त्र प्रशाळेतील प्रा. स.ना. पाटील यांची इंडियन सोसायटी ऑफ इंजिनीअरींग जिओलॉजीचे कार्यकारी परिषदेवर २०२६-२७ करीता सदस्य म्हणून निवड करण्यात आली आहे. संपूर्ण राज्यातून आणि विद्यापीठ परिसरातून  पहिले प्राध्यापक होण्याचा मान त्यांना प्राप्त झाला आहे.

इंडियन सोसायटी ऑफ इंजिनीअरींगजिओलॉजी  (आयएसइजी)  मध्ये स्थापित आणि एक वैज्ञानिक संघ आहे ज्यामध्ये अभियांत्रिकी  भुविज्ञान , भुतंत्रज्ञान  अभियांत्रिकी आणि स्थापत्य अभियांत्रिकी या क्षेत्रातील सदस्यांचा समावेश आहे. जो भारतातील नागरी विकास प्रकल्पांमध्ये गुंतलेल्या जवळजवळ सर्व आघाडीच्या संस्थांचे प्रतिनिधीत्व करतो या क्षेत्रात प्रा. स.ना. पाटील यांची कार्यकारी सदस्य म्हणून निवड झाली आहे.   या निवडीबद्दल कुलगुरू प्रा. व्ही.एल. माहेश्वरी, प्र-कुलगुरू प्रा.एस.टी. इंगळे व कुलसचिव डॉ.विनोद पाटील यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

**बातमी नं. ३**

जळगाव (प्रतिनिधी) दि. २४ :- कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या पर्यावरण व भूशास्त्र प्रशाळा आणि  मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने मराठी भाषा संवर्धन पंधरवाड्या निमित्त मंगळवारी २० जानेवारी २०२६ रोजी आयोजित भूविज्ञान नोंदलेखन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी प्र-कुलगुरू प्रा.एस.टी. इंगळे यांच्या अध्यक्षतेखाली या कार्यशाळेचे उद्घाटन झाले, संवाद साधतांना मातृभाषेत विज्ञान शिकवणे महत्वाचे आहे कारण ते संज्ञानात्मक भार कमी करते, जटिल संकल्पना अधिक सुलभ करते, तसेच पर्यावरणा बद्दलची सामाजिक आणि नैतिक जबाबदारीची भावना निर्माण होते, विद्यार्थ्यांचा सहभाग वाढवते, शैक्षणिक स्थर सुधारते आणि अधिक लोकांना प्रोत्साहीत करते असे सांगितले.

मराठी विश्वकोश मंडळाचे डॉ. रवींद्र घोडराज म्हणाले की, मराठी भाषा समृध्द करण्यासाठी मोफत ऑनलाईन उपलब्धतेसाठी मराठीत जागतिक ज्ञानाचा एक व्यापक, अधिकृत स्त्रोत म्हणून काम करण्यासाठी, संशोधनाला चालना देण्यासाठी आणि मराठीसाठी सर्व विषयांचे दस्तऐवजीकरण करून सांस्कृतिक वारसा जपण्यासाठी मराठी विश्वकोश महत्वाचा आहे असे त्यांनी सांगितले. तसेच प्राचार्य श्रीनिवास वडगबाळकर, सोलापूर व भूगर्भशास्त्रज्ञ डॉ. पी.एस. कुलकर्णी, छ. संभाजीनगर यांनी मराठीचे महत्व विषद केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक संचालक प्रा.संजय पाटील यांनी तर कार्यक्रमाचे सूत्रसंचलन कल्याणी क्षीरसागर आणि आभार प्रदर्शन डॉ. भावेश पाटील (समन्वयक) यांनी केले. या कार्यशाळेत संपूर्ण खान्देश मधून १०० हून अधिक शिक्षक,विद्यार्थी आणि शिक्षण तज्ञ,विद्वान अशा भूविज्ञान पार्श्वभूमी असलेल्यांनी सहभाग नोंदविला. कार्यशाळेच्या यशस्वीतेसाठी सर्व शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे सहकार्य लाभले.

---

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२६ | दिनांक: २४ जानेवारी, २०२६

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता